(10)

**परिपत्रक**
**अत्यंत महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 18, कामगार कल्याण विभाग
कमांक – काक/3/कावि/180/2014
दिनांक –24/06/2014

**विषय :– कामगार कायदयाच्या अंमलबजावणीबाबत.**

2/– पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागाकडून Minimum Wages Act, 1948, Payment Of Wages Act, 1936, Contract Labour ( Regulation & Abolition) Act 1970, Employee's Provident Funds and Mis. Provisions Act 1952, त्याचप्रमाणे इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम 1996 तसेच शासकिय विमा निधी इत्यादीबाबत प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गत करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचना/आदेश देण्यात आलेले आहेत. असे असतांनाही शासनाच्या विविध सक्षम विभागाकडे तकारी दाखल होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्व विभाग प्रमुखांना खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

1. कंत्राटी कामगारांचा पुरवठा करण्याबाबतच्या निविदा किमान वेतन दरापेक्षा कमी दराच्या स्विकारू नयेत. तसेच नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांना किमान वेतन दराने वेतन अदा केले जात असल्याबाबत विभाग प्रमुखांनी खात्री करून घेणे आवश्यक आहे.
2. कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांचे वेतन व त्या अनुषंगींक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबधीत कंत्राटी कामगारांच्या नावांने असलेल्या बॅंक खात्यात जमा करण्यात यावे किंवा Account payee Cross cheque द्वारे (रेखांकित चेकद्वारे) अदा करावेत.
3. संबधीत ठेकेदाराने पी.एफ., ई.एस.आय. कामगार कल्याण निधी संबधीत शासकिय संस्थेकडे कामगाराच्या नांवाच्या यादीसह भरलेबाबत तसेच नियुक्त कामगारांस किमान वेतन दराने वेतन अदा केले जात असल्याची वेतन रजिस्टरवरून खात्री करून पुढील महिन्याची देयके अदा करण्यात यावीत.
4. ठेकेदारामार्फत किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कामगारांस साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे हजेरी कार्ड, पगार स्लिप दिल्याची खात्री करून घ्यावी.
5. नियुक्त कामगारांना leave with wages, Paid holiday, Uniform Washing Allowance, Conveyance allowance इत्यादी अदा केले असल्याबाबत संबधीत विभागाने खात्री करणे आवश्यक आहे.

6. कंत्राटी कामगार कायदा 1970 कलम 12 अन्वये महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार/आस्थापनेमध्ये 20 किंवा 20 पेक्षा अधिक कामगार/सभासद काम करीत असतील तर अशा कंत्राटदारांने कंत्राटदाराने कामगार उप आयुक्त यांच्याकडून अनुज्ञप्ती (Contractor licence) घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे 20 किंवा 20 पेक्षा अधिक कामगार असलेल्या कंत्राटदाराने उप आयुक्त, कामगार, शिवाजीनगर, पुणे: 5 यांच्याकडून अनुज्ञप्ती (Contractor licence) घेतली आहे किंवा कसे याची खात्री संबधीत विभाग प्रमुखांनी करावी.

7. संबधीत विभागांनी ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या कामाचे आदेश, ठेकेदाराशी केलेले करारनामे, ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांची संख्या कामगारांच्या नांवाच्या यादीसह कामगार कल्याण विभागाकडे वेळेत पाठविण्यात यावी.

8. मा. कामगार व कायदा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक 8.1.2011 रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रानुसार Employee's Provident Funds and Mis. Provisions Act 1952 ची अंमलबजावणी महानगरपालिकेस बंधनकारक करण्यात आलेली आहे. या कायदयातील तरतुंदीच्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य मालक (Principle Employer)म्हणून महानगरपालिकेची आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या अधिन असणा–या सर्व कर्मचा–यांचा/कामगारांचा तसेच कंत्राटी कामगार, तात्पुरत्या स्वरूपाचे कामगार, बदली कामगार, कॉन्ट्रक्ट कामगार इत्यादी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे महानगरपालिकेसाठी काम करणारे (स्थापत्य विभागासह) अथवा महानगरपालिकेतर्फे लावण्यात आलेल्या सर्व कामगारांचा समावेश होत असल्याने ज्या ठेकेदारांनी स्वतंत्र पी.एफ. कोड नंबर घेतलेले आहेत त्यांनी नेमलेल्या कामगारांचा पी.एफ. भरलेबाबत पुरावे बिलासोबत जोडावेत तसेच ज्या ठेकेदारांना स्वतंत्र पी.एफ. कोड नंबर मिळालेले नाहीत त्यांनी नेमलेल्या कामगारांचा पी.एफ. सदर ठेकेदारांच्या बिलातून वसूल करून प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेच्या आत स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विशिष्ट पी.एफ. चलनाने ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कामगारांच्या पगारातून 12 टक्के व ठेकेदारांचा हिस्सा 13.61 असे मिळून 25.61 टक्के ठेकेदाराच्या बिलातून कपात करून तद्नंतरच ठेकेदारांच्या बिलांची अदायगी करण्यात यावी.

9. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम 1996 तसेच इमारत व उपकर अधिनियम 1998 अंतर्गत 1 टक्का उपकर वसूल केला जातो. सदरची रक्कम महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा केली जाते. याबाबत केंद्र शासनाने सन 1996 साली

केलेल्या इमारत व इतर बांधकाम कायदयाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्याने सुरू केली आहे. या योजनेनुसार बांधकाम, फेरफार, दुरूस्ती, देखभाल किंवा पाडून टाकणे, इमारत रस्ते मार्ग, रेल्वे, ट्रामवेज, विमानतळ, पाटबंधारे, जलनिःस्सारण, बंधारा, नौकानयन, पुरनियंत्रण, तेल व वायूची जोडणी टाकणे, विदयूत लाईन्स, वायरलेस, रेडीओ, टेलिव्हीजन, टेलिफोन, टेलिग्राफ, समुद्रपार दळणवळण, धरणे, कालवे, जलाशय, जलप्रवाह, बोगदे, पुल, सेतू, सेतूप्रणाली, पाईपलाईन, टावर्स, कुलींग टावर्स, पारेशन टावर्स इत्यादी क्षेत्रामधील कामांना सदरचा कायदा लागू होत असल्याने 1 टक्का उपकर वसूल करणेत यावा.

10. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाचा व कामगारांचा विमा शासकिय विमा निधी कार्यालयाकडे उतरविणेबाबत शासनाने कळविलेले आहे. त्यानुसार कामगार कल्याण विभागाने वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिकांनी त्यांच्या संपुर्ण मालमत्तेचा व महानगरपालिकेतर्फे देण्यात येणा–या कंत्राटी कामाचा व त्या कामावर काम करणा–या कामगारांचा विमा थेट पध्दतीने शासकिय विमा निधी कार्यालयाकडे उतरविण्याचे बंधन प्रकर्ता या नात्याने महानगरपालिकेवर आहे. त्यानुसार कंत्राटदारांना स्थानिक व तत्पर सेवा मिळावी व प्रशासकिय सोयीसाठी महानगरपालिका कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाचे व कामगारांचा विमा सहविमा पध्दतीने मे. नॅशनल इन्शोरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय जय टावर्स 154/4/2 काळभोरनगर, पुणे मुंबई रोड, चिंचवड, पुणे –19 यांच्याकडे उतरविण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. अन्य विमा कंपनी कार्यालयाकडून अथवा मे. नॅशनल इन्शोरेन्स कंपनीच्या अन्य कार्यालयाकडून विमापत्रे सादर झाल्यास ती स्विकारू नयेत.

सबब, विभाग प्रमुखांनी या परिपत्रकाची अंमलबजावणी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागवार करून घ्यावी. कायदयाच्या तरतुदींचे उल्लंघनामुळे निर्माण होणा–या कायदेशिर बाबींची जबाबदारी खातेप्रमुख/विभागप्रमुख यांची राहिल याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

आयुक्त, 13/6<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी – 411 018

प्रतिलिपी – सर्व विभाग प्रमुख

---